International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# आ. ह. साळुंखे यांची संत साहित्यविषयक भूमिका

**शुभम गजानन बुटले**

पीएच. डी. संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे पुणे - 411007

**प्रस्तावना**:आ. ह. साळुंखे यांनी सुमारे 50 वर्षापेक्षा अधिक काळ लेखन संशोधनात व्यथित केला. धर्मशास्त्र, इतिहास, साहित्य, समाजशास्त्र, भाषाशास्त्र, इ. ज्ञानशाखांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. राम, कृष्ण, शिव, निर्ऋती, बळी, चार्वाक, बुद्ध, बसवेश्वर, चक्रधर स्वामी, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इत्यादी बहुजन नायकांचा मूळ इतिहास शुद्ध स्वरुपात त्यांनी समाजापर्यंत पोहचवला. यासह वेद, उपनिषदे, पुराणे, वैदिक धर्मसूत्रे, यांची चिकित्सा त्यांनी केली. संत साहित्याच्या संदर्भातदेखील संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ संत तुकाराम इ. संतांच्या जीवनचरित्रातील विकृतीकरन थोपवून त्यांचे नवे अन्वयार्थ त्यांनी लावले. वैदिक परंपरेने एका विशिष्ट चाकोरीत बंदिस्त केलेल्या संतपरंपरेला आ. ह. साळुंखे यांनी त्या चाकोरीतून बाहेर काढले. कोणत्याही संतांचे चरित्र आपल्यासाठी बंदिस्त चाकोरी ठरू नये म्हणून ते लिहीतात, ‘‘ज्या महामानवांनी स्वतः वणव्यांतून चालून आपल्यासाठी हिरवळ निर्मान केली, त्यांचे आपल्यावर उपकार आहेत, यात शंका नाही. पण त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन प्रत्यक्षात काही आचरण करायचं नाही आणि सतत त्यांच नाव मात्र उच्चारत राहायचं, असं केलं, तर त्यांच्या नावाची अवस्था एखाद्या गुळगुळीत नाण्यासारखी होईल. असं घडू नये यासाठी आपण सतत सावध रहायला हवं. त्यांच नाव गुळगुळीत नांणं बनू नयेच, पण अग्नीतून तावून सुलाखून निघालेल्या सोन्याप्रमाणं अधिक उजळ बनून चमकू लागेल, असं कर्तृत्व आपण गाजवायला हवं. कोणत्याही महामानवाचं चरित्र हे आपल्यासाठी बंदिस्त करून टाकणारी चाकोरी बनता कामा नये. त्या चरित्रातून नव्या समाजरचनेच्या निरभ्र आभाळात झेपावण्यासाठी आपल्याला बलशानी पंख लाभावेत महामानवांच नुसतं नाव घेऊन चाकोरीत अडकायचं, की त्यांच्यापासून स्फुर्ती घेऊन नव्या काळाला साजेशी उमदी आणि निर्दोष समाजरचना करण्यासाठी सज्ज व्हायचं, याचा निर्णय आपला आपणच घ्यायला हवा.’’[1] आ. ह. साळुंखे यांचे हे आवाहन महामानवांच्या चरित्राची मानवतावादी भूमिका दाखवते.

बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात निर्मान झालेला भागवत संप्रदाय हा महाराष्ट्राच्या सांस्कृतीक जीवनाला कलाटनी देणारा मोठा टप्पा समजला जातो. महाराष्ट्राच्या समाजमनावर दीर्घ सकारात्मक परिणाम झाला. आजदेखील तो पहायला मिळतो. या भागवत संप्रदायाला तथागत बुद्धाच्या जीवनातून प्रेरना मिळाली हे आ. ह. साळुंखे यांनी सप्रमान दाखवले. ही प्रेरणा साधार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ते म्हणतात? ‘‘भागवत संप्रदायाचे ‘भागवत’ हे नाव ‘भगवत’ या शब्दापासून आले आहेत. भगवंताला मानतो तो भागवत, असा त्यांचा अर्थ आहे. आता ‘भगवत’ हा शब्द भारताच्या इतिहासात सर्वप्रथम तथागतांना उद्देशून वापरण्यात आला होता,हे ध्यानात घेता भागवत संप्रदायाला त्यांच्या विचारातून प्रेरणा मिळाली हे उघड आहे. शंकराचार्यांनी भागवत संप्रदायाला अवैदिक का मानले आणि भागवत संप्रदायानेही अहिंसा वगैरे तत्वे का उचलून धरली, याचा उलगडा हा ऐतिहासिक वास्तवातून होतो. पुढच्या काळात या संप्रदायाचे मोठ्या प्रमानात वैदिकीकरण घडविण्यात आले, ही गोष्ट वेगळी.’’[2] हे आ. ह. साळुंखे यांचे विश्लेषन तथागत बुद्ध व भागवत संप्रदाय यांच्या समन्वयाकडे लक्ष वेधनारे आहे. आणि तथागत बुद्धांचा विचारप्रवाह महाराष्ट्राच्या संतपरंपरेत कसा वाहत आला हे दर्षविनारे आहे. अवैदिक विचारप्रवाहातील तथागतांचा विचार संतपरंपरेत कसा उतरला याचे भान निर्देशीत करतो. आ. ह. साळुंखे यांच्यापूर्वी देखील अनेक अभ्यासकांनी भागवत संप्रदायावर तथागत बुद्धांचा प्रभाव असल्याचे नोंदविले. डॉ.

बाबासाहेब आंबेडकर यांनी पंढरपूर येथील विठ्ठलाची मूर्ती ही बुद्धाची मुर्ती असल्याचे म्हटले आहे. वरील सर्व विवेचनातून आ. ह. साळुंखे यांनी संतपरंपरेचे चिकित्सक दृष्टीकोनातून विश्लेषण केलेले आहे हे लक्षात येते. तथागत बुद्धांच्या विचारांचे जे व्रन संत साहित्यात आहे. ते त्यांनी वस्तुनिष्ठ भूमिकेतून मांडले.

**संत ज्ञानेश्वर**: 'धर्म की धर्मापलीकडे?' या ग्रंथात आ. ह. साळुंखे यांनी संत ज्ञानेश्वरांच्या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली आहे. धर्मावर निष्ठा असलेल्या लोकांचे वेगवेगळे प्रकार समाजव्यवस्थेत आहे. प्रत्येकाला मिळालेले वातावरण, त्यांच्यावर झालेले संस्कार इ. फरक पाहायला मिळते. प्रत्येकाची विचार करण्याची पद्धत वेगळी असते, कुवत वेगळी असते. एकंदरीत प्रत्येकाच्या जीवनाचे विश्व वेगळे असते. संत ज्ञानेश्वरांच्या संदर्भात विचार करता काही मुद्दे आपल्यापुढे उपस्थित होतात. संत ज्ञानेश्वरांनी आणि त्यांच्या भावंडांना तत्कालिन धर्ममार्तंडांनी त्याकाळी अपार यातना दिल्या 'संन्याश्याची मुले म्हणून हेटाळनी केली, ती उगाच नव्हे, एकेकाळी ज्या सनातनी लोकांनी संत ज्ञानेश्वरांचा छळ केला, त्या ज्ञानेश्वरांबद्दल आता सनातनी लोकांना खून आदर वाटतो. आज सनातनी लोकांनी ज्ञानेश्वरांना अगदी मनापासून स्विकारलेले दिसते, त्यामुळे पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांची नाळ तुटताना आज पाहायला मिळते. मात्र आ. ह. साळुंखे संत ज्ञानेश्वरांच्या चरित्राकडे व कार्याकडे अधिक डोळसपणे पाहण्याची गरज असल्याचे अधोरेखित करतात. त्यांच्याशी असलेली आपली नाळ अधिक असलेली देखील आ. ह. साळुंखे सांगतात. ते म्हणतात, ''सर्व-सामान्य लोकांचे श्रद्धास्थान बनलेल्या या संतांना सनातन्यांनी पूर्वी छळलेले असताना आता आपल्या सोईसाठी ते त्यांना आत्मसात करू पाहत असतात. अशा वेळी आपनही या संतांकडे विरोधी दृष्टीने पाहणे म्हणजे सनातन्यांची सोय करून देणेच होय. या संतांच्या कार्याचे मूल्यमापनही जरूर करावे. परंतु त्याबरोबरच सनातन्यांहून वेगळया प्रकारची मूल्ये स्विकारण्याची बंडखोरी केल्यामूळे त्यांनी छळही सोसला होता. याची आठवन ठेवली पाहिजे एवढेच नव्हे, तर त्यांच्याशी सनातन्यांची जीतकी नाळ जोडलेली आहे, त्यापेक्षा जास्त आपली नाळ जोडलेली आहे, हे ध्यानात घ्यावे''[3] हे मोठ्या अभिमानाने आ. ह. साळुंखे नोंदवतात. एवढेच नाही तर ज्ञानेश्वरांना संस्कृत जाणनाऱ्या लोकांचा अहंकार व सनातन्यांविषयीची तुच्छता मान्य नव्हती. त्यांनी आपला ग्रंथ संस्कृऐवजी सर्वसामान्यांच्या मराठीत लिहिल्याकडे आ. ह. साळुंखे आपले लक्ष वेधतात. सनातन्यांनी ज्ञानेश्वरांना स्विकारून सोईसाठी घेतलेली भूमिका ही बहुजनांपासून त्यांना तोडणारी आहे. असे त्यांना वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बहिष्कृत भारताच्या पाक्षिकाच्या मुखपृष्ठावर ज्ञानेश्वरीतील ओव्या बाबासाहेबांनी उद्‌धृत केल्याकडे आ. ह. साळंुखे यांनी आपले लक्ष वेधले आहे. म्हणून समतावादी चळवळीषी संत ज्ञानेश्वरांचे नाते असल्याचे त्यांनी आवर्जुन सांगितले आहे. ते म्हणतात, ''समतावादी चळवळीतील कार्यकर्त्यांनी ज्ञानेश्वरांना समजून घ्यावे, हे माझे मत या चळवळीतील काही व्यक्तींना कदाचित मान्य होणार नाही. असे असले तरी मला स्वःत ला ज्ञानेश्वरांबरोबर असलेली नाळ तोडाती वाटत नाही. अखेरीस तेही येथील वैदिकांच्या शोषणव्यवस्थेला बळी पडले होते आणि बहुजन समाजाने अगदी अंतःकरपूर्वक त्यांना आपलेसे केले होते. याचा अर्थ त्यांचे सर्व विचार आपल्याला मान्य होतील, असे मुळीच नाही. त्यांचे मुळचे विचार जसेच्या तसे आपल्यापर्यंत आलेले नाहीत, हेही आपण ध्यानात घेतले पाहिजे. जो जो अन्यायाला बळी पडला असेल, तो तो आपला, अशी भावना बाळगली, तर आपण ज्ञानेश्वरांना दूर लोटू शकनार नाही, असे मला वाटते.''[4] वरील विवेचनातून ज्ञानेश्वर आपलेच असल्याचे ते निर्देश करतात आणि या निमित्ताने महाराष्ट्राच्या सांस्कृतीक जीवनातील मोठा गुंता ते सोडवतात.

**संत नामदेव**:संत ज्ञानेश्वरांप्रमानेच 'वादांची वादळे' या ग्रंथात तुकाराम हे ज्ञानेश्वरांचे उत्तराधीकारी असल्याबद्दलच्या आक्षेपाला उत्तर देताना तुकाराम हे ज्ञानेश्वरांपेक्षा नामदेवाचे उराधीकारी म्हणून अधिक शोभतात हे ठामपणे ते नोंदवतात. शीख धर्माच्या धर्मग्रंथात संत नामदेवाचे अनेक अभंग समाविष्ट करण्यात आले. उत्तर भारतात महाराष्ट्राच्या इतर संतांपेक्षा

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

संत नामदेवाचा प्रभाव अधिक जास्त असल्याचा उल्लेख त्यांनी केला आहे. संत नामदेवांच्या संदर्भातील एक कथा प्रसिद्ध आहे. संत नामदेव औंढ्या नागनाथच्या मंदिरात कीर्तन करीत असताना ते शुद्र असल्यामुळे त्यांना कीर्तन थांबवावे लागले. शुद्र असल्याच्या कारनाने त्यांना मंदीराच्या मागे जाऊन कीर्तन करावे लागले. जेव्हा संत नामदेव मंदिराच्या मागे जाऊन कीर्तन करायला लागले तेव्हा देवानेच मंदीराचे तोंड त्यांच्याकडे फिरवले. शुद्र म्हणून जन्माला आलेल्या नामदेवांना तत्कालिन प्रस्थापित समाजव्यवस्थेहत हिन वागनूक दिली. या घटनेचा संबंध नामदेवांच्या शुद्रत्वाषी असल्याचे सांगताना आ. ह. साळुंखे म्हणतात, “ही मिथ त्यांच्या गौरवासाठी रचली गेली म्हणून बाजूला सारली तरी त्यांना मंदिरात किर्तन करू दिले नाही, ही ऐतिहासिक घटणा असून तिचा संबंध त्यांच्या शुद्रत्वाषी होता. हे उघड आहे.”[5] संत नामदेवांच्या संदर्भातील ही घटना कोणा मुस्लिम-सुलतानने घडवून आणल्या नव्हत्या, तर वर्णवर्चस्वाची भावना प्रबळ असलेल्या प्रस्थापित व्यवस्थेने ही घटना घडवून आणल्याचे आ. ह. साळुंखे सांगतात.

**संत एकनाथ**:संत एकनाथांनीदेखील जनसामान्यांचे जीवन प्रसन्नतेने फुलावे म्हणून जातीधर्माच्या पलिकडे जाऊन समतेचा विचार आपल्या साहित्यात मांडल्याबद्दल आ. ह. साळुंख त्यांचा गौरव करतात. संत एकनाथ यांच्यासंदर्भातील चर्चा त्यांनी ‘विद्रोही तुकारामः समीक्षेची समीक्षा’ या ग्रंथात केली आहे. अर्थात संत एकनााथ यांच्यासंदर्भात त्यांनी स्वतंत्रपणे लेखन केलेले नसले तरी यानिमित्ताने संत एकनाथ यांच्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोण स्पष्ट होतो. संत एकनाथ यांची विचारसरणी ब्राह्मणी व्यवस्थेला आव्हान देणारीच होती. म्हणून तत्कालीन प्रस्थापित व्यवस्थेने त्यांच्यावर बहिष्कार टाकला होता. हे सुस्पष्ट आहे. यासंदर्भात आ. ह. साळुंखे म्हणतात, “एकनाथांनीही वैदिक परंपरेचे काही नियम मोडले, म्हणूनच त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात आला होता. म्हणजे एकनाथांनाही वैदिक परंपरेने दूर लोटले होते. कारण, त्यांनी काही प्रमाणात वैदिकता सोडली होती. तात्पर्य, ज्ञानेश्वर आणि एकनाथ हे पूर्णांशाने वेदविरोधी नसले, तरी त्यांचा आंशिक वेदविरोध वा वेदच्युती हेच त्यांच्या विटंबनेचे मुख्य कारण होते.”[6] याबरोबर औरंगाबाद येथे एकनाथ रिसर्च सोसायटी स्थापण झाल्यानंतर बाबासाहेब आंबेडकरांनी त्या संस्थेला पाठवलेल्या संदेश्याकडे आपले लक्ष वेधून संत एकनाथांचे विचार हे समतेचे विचार असल्याचे दाखवून देतात.

**संत तुकाराम**: प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आ. ह. साळुंखे संत तुकारामाच्या जीवनाकडे ज्या दृष्टीकोणातून पाहतात तो दृष्टीकोन शोधण्याचा अल्पसा प्रयत्न करणार आहे. आ. ह. साळुंखे यांनी संत तुकारामाच्या जीवनातील अनेक दुर्लक्षित पैलुंवर प्रकाश टाकून नवे अन्वयार्थ लावले आहेत. काही सन्माननिय लेखकांचा अपवाद वगळता तुकारामाच्या अनेक चरित्रकारांनी आपल्यासामोर उभी केलेली त्यांची प्रतिमा मूळ प्रतिमेशी सुसंगत नसल्याचे आ. ह. साळुंखे दाखवतात. “तुकाराम म्हणजे दिवाळे निघाल्यामुळे असहाय होऊन ईश्वराच्या भक्तीकडे वळलेला, नीटपणे संसार करू न शकलेला, सदैव टाळ कुटत बसलेला, व्यवहारशुन्य, भोळाभाबडा, किंबहुना भोळसट संत, असे काहिसे त्यांचे चरित्र आपल्यासमोर उभे करण्यात आले आहे. वस्तुस्थिती अशी आहे, की येथील समाजमनावर प्रभाव गाजवत असलेल्या एका उद्दाम, अहंकारी आणि धर्माच्या नावावर अनीतीचा बाजार मांडनाऱ्या धर्मसत्तेला कडवे आव्हान देणारा हा संत म्हणजे एक महान लढवय्या होता. अंतरंगाने किडक्या परंतु बहिरंगाने अत्यंत प्रबळ व मजबूत असलेल्या एका समाजव्यवस्थेच्या मुळाशी निर्भयपणे सुरुंग लावण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. एका अनैतिक व्यवस्थेविरुद्ध प्रचंड विद्रोह केला. अशा बहादूर व्यक्तीला एका भोळसट व असहाय व्यक्तित्वाच्या स्वरूपाात रेखाटणे म्हणजे एखाद्या सिंहाचे चित्र शेळीच्या स्वरूपात काढणे किंवा एखाद्या धगधगत्या निखाऱ्याचे वर्णन थंडगार कोळसा म्हणून करणे होय. हे उघडउघड विकृतीकरण आहे आणि तुकारामांविषयी लिहिनाऱ्या बहुसंख्य लेखकांनी अशा प्रकारचे विकृतीकरण केले आहे, ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे.”[7] अशाप्रकारे तुकारामाची छिन्नविछिन्न केलेली प्रतिमा आ. ह. सांळुखे यांना अमान्य आहे. नव्हे, संत तुकारामाची बदनामी करण्याचे सांस्कृतीक

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

षडयंत्रच आहे असे त्यांना वाटते. म्हणून आ. ह. साळुंखे यांनी तुकारामाच्या जीवनातील अनेक घटना ज्यांचे विकृतीकरन झाले, त्या विकृतीकरनाला थोपवून त्या घटनांचा वस्तुनिष्ठपने मूळ घटनांशी असलेला संबंध चिकित्सक दृष्टीकोणातून तपासून पाहिला, आणि ऐतिहासिकदृष्ट्या एक नविन भर संतसाहित्यात घातली. जी संत तुकारामाच्या मुळ प्रतिमेशी जुळनारी आहे, आपल्या अभ्यासातून त्यांनी ती सप्रमान मांडली. पारंपरीक प्रतिमेतील अनेक घटक दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. थोडक्यात सांगायचे तर बहुजनांच्या शोषणाविरूद्ध आवाज उठविनारा आव्हानवीर योद्धा व कृतीशील संत हे सूत्र घेऊन त्यांनी तुकारामविषयक मांडणी केली. प्रचंड अभ्यासाच्या बैठकीतून तयार झालेल्या या संत तुकारामविषयक चिंतनाची मांडणी त्यांनी 'विद्रोही तुकाराम', 'विद्रोही तुकाराम: समीक्षेची समीक्षा', संत तुकाराम आणि तथागत बुद्ध', 'तुकरामाचा शेतकरी', 'संत तुकारामाचे निवडक अभंग', 'न सरे ऐसे तुकोबाचे दान !', 'संत तुकारामाचे निवडक अभंग', इ. ग्रंथांतून केलेली आहे. या सर्व लिखानातून आ. ह. साळुंखे यांनी केलेली संत तुकारामविषयक मांडणी माणसाला अधिक सजक, विवेकी, विचारप्रवर्तक आणि समृद्ध केल्याशिवाय राहत नाही.

**इतर संत:** प्रस्तुत शोधनिबंधात या ठिकाणी इतर संतांच्या संदर्भात आ. ह. साळुंखे यांचा दृष्टीकोन लक्षात घेणार आहे. संत चोखामेळा यांच्यासंदर्भात त्यांनी स्वतंत्रपणे लिहीले नसले तरी, प्रत्येकवेळी त्यांनी चोखामेळ्याच्या संदर्भात आदर व्यक्त केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथील रघुनाथ शेंबडे प्रतिष्ठान या संस्थेने 'बळीवंष' या पुस्तकासाठी स्मृतिशेष कृष्णा शेंबडे यांच्या स्मृत्यर्थ 'श्रीसंत चोखमेळा साहित्य पुरस्कार' देऊन त्यांचा गौरव केला. त्यावेळी त्यांनी चोखामेळा यांच्यासंदर्भात असलेली त्यांची भावना त्यांनी विस्ताराने मांडली. संत चोखोबांच्या पुस्तक प्रकाशनाच्या वेळी ते जे बोलले, त्याचा अंश आठवताना ते म्हणतात, "चोखोबा काय बोलले, याचे मूल्यमापन जरूर करावे; परंतु ते बोलले, हाच एक विद्रोह होता, हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे."[8] त्यांच्या या सर्व भूमिकेवरून त्यांच्या मनात चोखोबांविषयी किती आदराची भावना होती याची कल्पना करता येते.

गोव्यातील अर्जुन परब यांच्या संत गाडगे महाराजांवचरील पुस्तकाला आ. ह. साळुंखे यांनी प्रस्तावना लिहीली. त्या प्रस्तावनेत आ. ह. साळुंखे संत गाडगे बाबांच्या संदर्भात म्हणतात, "भारताच्या सामाजिक, सांस्कृतीक इतिहासात महान कार्य केलेल्या संत महात्म्यांच्या मालिकेमधील एक अत्यंत महामानवांचा दुवा म्हणजे संत गाडगेबाबा. सर्व-सामाण्य माणसांच्या कल्याणाची अपार तळमळ आणि आत्यंतिक करुणा ही संतांच्या कार्याची जी मूळ प्रेरणा, त्याच प्रेरणेतून त्यांनी आपले आयुष्य खर्ची घातले."[9] आ. ह. साळुंख योचे हे विवेचन गाडगेबाबांचा यथोचित गौरव करणारे आहे. या ग्रंथाला लिहिलेल्या प्रस्तावनेतून आ. ह. साळुंखे यांची गाडगे बाबा यांच्या संदर्भात असलेली समग्र भूमिका समोर आली नसली तरी या भूमिकेचे जे सार या निमित्ताने समोर आले ते फार महत्वावाचे आहे. याप्रमाने 'पुरंदरेंची इतिहासद्रोही बखर' व 'विद्रोही तुकाराम: समीक्षेची समीक्षा' या ग्रंथांतून संत सोयराबाई, संत कर्ममेळा, संत बंका, सावता माळी, इ. संतांविषयीची त्यांची भूमिका समोर आली आहे. माणवी जीवनाच्या मर्यादा लक्षात घेता ज्याप्रमानात आ. ह. साळुंखे यांनी संत साहित्याच्या संदर्भात आपली भूमिाका मांडली ती फार महत्वाची आहे. संत साहित्याच्या संदर्भात अनेक संतांविषयी आ. ह. साळुंखे यांनी थेटपणे काही लिहिले नसले तरी त्यांच्यामनात असलेला संतांविषयीचा आदर वरिल विवेचनातून निसंदिग्धःपणे सुस्पष्ट होतो.

**समारोप:**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आ. ह. साळुंखे संत साहित्याकडे ज्या दृष्टीकोणातून पाहतात तो दृष्टीकोन शोधण्याचा प्रयत्न केला आहे. आ. ह. साळुंखे यांनी संत साहित्यातील अनेक दुर्लक्षित पैलुंवर प्रकाश टाकून नवे अन्वयार्थ लावले आहेत. काही सन्माननिय लेखकांचा अपवाद वगळता तुकारामाच्या अनेक चरित्रकारांनी आपल्यासामोर उभी केलेली त्यांची प्रतिमा मुळ प्रतिमेशी सुसंगत नसल्याचे आ. ह. साळुंखे दाखवतात. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम,

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इत्यादी बहुजन नायकांचा मूळ इतिहास आ. ह. साळुंखे यांनी शुद्ध स्वरुपात समाजापर्यंत पोहचवला. यासह वेद, उपनिषदे, पुराणे, वैदिक धर्मसूत्रे, यांची चिकित्सा त्यांनी केली. संत साहित्याच्या संदर्भातदेखील संत ज्ञानेश्वर संत तुकाराम संत नामदेव, संत एकनाथ इ. संतांच्या जीवनचरित्रातील विकृतीकरन थोपवून त्यांचे नवे अन्वयार्थ लावले. वैदिक परंपरेने एका विशिष्ट चाकोरीत बंदिस्त केलेल्या संतपरंपरेला आ. ह. साळुंखे यांनी त्या चाकोरीतून बाहेर काढले. हे वरील विवेचनातून लक्षात येते.

**संदर्भग्रंथ:**

1. साळुंखे आ. ह., 'अंधाराचे बुरूज ढासळतील', लोकायत प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती, जून 2008, पृ. 48
2. साळुंखे आ. ह., 'सर्वोत्तम भूमिपुत्रः गोतम बुद्ध', लोकायत प्रकाशन, सातारा, द्वितीयावृत्ती, मे 2007, पृ. 18
3. साळुंखे आ. ह., 'धर्म की धर्मापलीकडे', लोकायत प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती, जून 1990, पृ. 101
4. साळुंखे आ. ह., 'विद्रोही तुकारामः समीक्षेची समीक्षा', सुगावा प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, डिसेंबर 2013, पृ. 80
5. साळुंखे आ. ह., 'वादांची वादळे', लोकायत प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती, जून 2001, पृ. 150
6. उनि, 'विद्रोही तुकारामः समीक्षेची समीक्षा', पृ. 21
7. साळुंखे आ. ह., 'विद्रोही तुकाराम', लोकायत प्रकाशन, सातारा, तृतीयावृत्ती, सप्टेंबर 2010, पृ. 10
8. साळुंखे आ. ह., 'सर्वोत्तम भूमिपुत्रः आक्षेप', लोकायत प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती, सप्टेंबर 2011, पृ. 37
9. तत्रैव, पृ. 35